महाराष्ट्र वन विभाग

**महाराष्ट्र शासन**
**वनविभाग**
**सदस्य सचिव,**
**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान इको सेन्सीटीव्ह झोन सनियंत्रण समिती तथा**
**उप वनसंरक्षक, ठाणे वनविभाग यांचे कार्यालय**

दूरध्वनी क्र. 022- 2542 1373 / 022- 25434349

ईमेल- dycfthane@mahaforest.gov.in dcfthane@gmail.com

मॅरेथॉन सर्कल, लाल बहादूर शास्त्री मार्ग, नौपाडा, ठाणे-400602

**पत्र** जा.क्र. कक्ष-१/२०/जमीन/ ९८०८ /२०२४-२५ दिनांक १५ जुलै, २०२४

प्रति,

कार्यकारी अभियंता,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई

**विषय:-** संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समितीच्या दिनांक ११.०७.२०२४ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत... ठाणे ते बोरिवली दुहेरी भुमिगत बोगद्याचे बांधकाम करणेबाबत....

**संदर्भ :**
१) पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाकडील अधिसूचना क्र. का.आ.३६४५(अ), दिनांक ०५.१२.२०१६ व क्र. का.आ.४००४(इ), दिनांक ०५.११.२०२०
२) कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांचेकडील पत्र क्र. MMRDA/ESZ/TBTT/07/2024, दिनांक 27/06/2024 अन्वये प्राप्त प्रस्ताव
३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समितीची दिनांक ११.०७.२०२४ रोजीची बैठक.

ठाणे ते बोरिवली दुहेरी भुमिगत बोगद्याचे बांधकाम करणेकरीता परवानगी मिळणेसाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समितीची परवानगी मिळणेकरीता आपणाव्दारे संदर्भ क्र. २ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

आपल्याकडील उपरोक्त नमूद प्रस्तावाचे अनुषंगाने मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखालील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समितीच्या दिनांक ११.०७.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाली आहे.

केंद्र शासनाकडील दिनांक ०५.१२.२०१६ रोजीच्या अधिसुचनेतील मुद्दा क्रमांक ०४ परिच्छेद क्रमांक ११ नुसार प्रस्तावाधिन बांधकामाचा Regulated Activity मध्ये समावेश होत आहे. तसेच सदर प्रस्तावांतर्गत कामे लोकहितपयोगी असलेने, सदर प्रस्तावांतर्गत करण्यात येणारी वृक्षतोड महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण

व जतन अधिनियम कायदा १९७५ नुसार प्रथम सक्षम प्राधिकरणाची परवानगी प्राप्त करावी या अटीवर, तसेच सदर प्रस्तावास केंद्र शासनाकडील प्राप्त तत्वत: मंजूरी पत्रातील अटी, प्रकल्पास देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशामधील अटी, राज्य वन्यजीव मंडळाद्वारे शिफारस करताना नमूद केलेल्या अटी, राष्ट्रीय वन्यजीव मंडाळाने शिफारस करताना नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठाणे ते बोरिवली दुहेरी भुमिगत बोगद्याचे बांधकाम मौजे चितळसर मानपाडा, ता.ठाणे येथील स.क्र. 59/अ/1पै, 59/अ/2पै., 59/अ/3पै, 59/अ/4पै क्षेत्र 26810.00 चौ.मी.भूखंड क्षेत्रात इतर तत्सम कामे करावयाची असल्याने ती कामे करताना केंद्र शासनाकडील दिनांक १४ सप्टेंबर, २००६ रोजीच्या अधिसुचनेतील तरतूदींचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी व आपलेमार्फत पुढील संस्करण करण्यात यावे.

**सदस्य सचिव,**
**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र**
**सनियंत्रण समिती**
तथा
**उप वनसंरक्षक**
**ठाणे वन विभाग, ठाणे**

प्रतिलिपी : अध्यक्ष, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समिती तथा आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस समोर, मुंबई – ४००००१ यांच्याकडे माहितीस्तव सादर.

प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांचेकडे माहितीस्तव सादर.